स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड सामाजिक शास्त्र विभागाअंतर्गत 'राज्यशास्त्र' विषयातील पी एच.डी पदवीसाठी शोध प्रबंध.



हिंदु कोड बील वरील डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची भुमीका एक चिकीत्सक अभ्यास

संशोधक

सिमला बन्सीधर तुपसमिंद्रे

एम.ए,एम.फिल (राज्यशास्त्र)

मार्गदर्शक

प्रा.डॉ.पी.एस.लोखंडे

सहाय्यक प्राध्यापक, राज्यशास्त्र विभाग,

श्री शिवाजी महाविद्यालय परभणी

संशोधन केंद्र

पीपल्स कॉलेज, नांदेड

वर्ष

मार्च 2022

प्रकरण पहिले

प्रस्तावना :

जगात माणूस एकटा राहू शकत नाही. एकमेकांशी सबंध ठेवून त्याला जीवन जगावयाचे असते. मनुष्य हा समाजशिल प्राणी आहे. त्याला नियम घालून दिलेले असतात. नियमांची उभारणी केलेली असते. नियमांची उभारणी व्यक्ती समूह करीत असतो. समाज करीत असतो. शासन व्यक्तीला बंधनकारक अशा नियमांची उभारणी करीत असते. हे शासन जर लोकतंत्री नसेल. एकतर्फी असेल तर शासन व्यवस्था पाहण्यास एखादा राजा किंवा एखादा हुकुमशहा व्यक्तीस बंधनकारक अशा नियमांची निर्मिती करीत असतो. हे नियम पाळले गेले नाहीत म्हणजे माणूस दंडास किंवा शिक्षेस पात्र ठरतो. या नियमांनाच कायदे म्हटले जाते. माणसास शिक्षा एक तर समाज करीत असते किंवा सरकार करीत असते किंवा शासन कर्ता राजा करीत असते. व्यक्ती व्यक्तीत असा संबंध प्रस्थापित करणाऱ्या अशा नियमानाच कायदे म्हटले जाते.[1]

अभ्यास विषयाचे महत्व :

भारतीय रुढी पंरपरेत रुढी हाच कायदा होता. पण पंरपरा हाच कायदा होता. परंतु इंग्रज सरकारमुळे पंरपरा कालबाहय ठरवून भारतीय जनतेला कायद्याचा विचार करावा लागला. जो भारतीय राज्यघटनेची निर्मिती करण्याची संधी डॉ. आंबेडकरांवर पडली व पुढे भारतीय राज्य घटना स्विकारल्यानंतर हिंदु कोड बिल संहितेवर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी अभ्यास सुरु केला. ज्यात महिलांना विशेष अधिकार देण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. जे नियम मनुने आखुन दिलेले होते. तेच महिलांना बंधनकारक होते. मनुने शुद्रांनाच झोडपले नाही तर महिलांना ही कसे अशक्य बनवले आहे. ते हे विधेयक सादर करुन डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दाखवुन दिले आहे. लॉर्ड मेकॉलेच्या वेगवेगळ्या कायदे संहिता तयार केल्या

गेल्या व त्या सगळ्या जमातीना लागू केल्या गेल्या. 1856 पर्यंतचे कायदे सगळ्या धर्मियांना समान होते. त्यानंतरचे व्यक्तीगत स्वरुपातले कायदे त्या त्या धर्मियासाठी वेगळ्या कायदयाची व्यवस्था केली गेली.[2]

संशोधनाची समस्या :

संशोधन ही एक शास्त्रीय पध्दती आहे. ज्ञान, आकलन, उपाय योजना अभिरुची इत्यादी हया उदिष्टांना अनुसरुन डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे हिंदु कोड बील अभ्यासणे काळाची गरज आहे. अशाच एका समस्येवर उपाय योजना करण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या हिंदु कोड बिलास घेतले आहे. हिंदु कोड बिल अभ्यासणे काळाची गरज आहे.

वरील मोजमाप घेण्यासाठी एक समस्या आहे. म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे हिंदु कोड बील अभ्यासास घेतलेले आहे.

आज स्त्रीला कोणत्याही समाजात जुन्या पंरपरा राखुन ठेवल्या आहेत. तीला उच्च शैक्षणिक दर्जा मिळत नाही. आणि त्यांना पतीच्या संपत्तीत हक्क नाही. त्यामुळे तीच्यात निर्णय घेण्याची क्षमता नाही. डोनाल्ड स्मीथनुसार क्रांतीकारी कायदेशीर तत्वे ब्रिटीशामधून परीचीत होता. जो कायद्यासमोर समानता पाश्चीमात्य संकल्पना हिंदु आणि मुस्लीम दोन्हीच्या तात्पुरती गृहीत धरलेली गोष्ट मुळ पूर्णपणे विरोधी आहे. हिंदु जाती व्यवस्था धर्म सत्ता खोटी आणी प्राचीन संहीता काही गुन्हयात फरक वर्णन केलेला आहे. [3]

पुर्व साहित्याचा आदावा :

प्रस्तुत संशोधनापुर्वी स्वामी रामानंद तीर्थ मराठ्वाडा विद्यापीठात यापुर्वी डॉ. स्वामी रामानंद तीर्थ मराठ्वाडा विद्यापीठात यापुर्वी ‘‘ डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या शैक्षणीक तत्वज्ञानाचा चिकित्सक अभ्यास ’’ यावर ‘‘ प्रा. श्रीमती पांडे मीनाक्षी रामचंद्रराव ’’ यांनी संशोधन केले आहे. तसेच ‘‘ डॉ. बाबासाहेब आंबेडकर ’’ बहिष्कृत भारतातील अग्रलेखाची वैचारीक भूमीका ’’ यावर ‘‘ माधव ग्यानोबा बसवंते ’’ यांनी संशोधन केले आहे.

‘‘ महाराष्ट्रातील आंबेडकरी राजकारणाचा चिकित्सक अभ्यास ’’ यावर प्रा. उबाळे अर्जुन

सोनाजी यांनी संशोधन केले आहे. '' धम्मदीक्षा सुवर्ण महोत्सव आणि महाराष्ट्रातील धर्मांतरे

यावर लोखंडे नंदलाल किसनराव यांनी संशोधन केले आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या धर्मांतराचे यावर लोखंडे नंदलाल किसनराव यांनी संशोधन केले आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या धर्मांतराचे दलित समाजाचे परिवर्तन यावर कांबळे राजकुमार संतराम यांनी संशोधन केले आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि ब्राम्हणेत्तर नेतृत्व याचा ऐतिहासिक आढावा '' यावर काशिद सर्जेराव देवराव '' यांनी संशोधन केले आहे.

मानव हा समाजप्रिय प्राणी असल्याने तो समाजात राहतो. त्यातून त्याचे सामाजिक प्रश्न निर्माण होतात. हे प्रश्न सोडवण्यासाठी हिंदु कोड बीलवर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी कार्य केले. जे संशोधनातुन समाजापुढे ठेवणे अत्यावश्यक आहे.[4]

संशोधनाचे उदिष्टे :

संबंधित संशोधन विषय '' हिंदु कोड बील '' वरील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची भुमीका एक चिकीत्सक अभ्यास विषय हा सध्याचा विषय निवडण्यामागे आंबेडकरी विचारांना मागे ठेवून पुढे जाणे शक्य नाही, म्हणून संबंधीत संशोधनात '' हिंदु कोड बील '' वरील डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची भुमीका सामान्य व्यक्तीच्या विकासासाठी हया संशोधनाची हाताळणी महत्वाची आहे.

1. मनुस्मृतीत स्त्रियांना धार्मीक स्वातंत्र देण्यात आले नव्हते.
2. मनुस्मृतीत स्त्रियांना शिक्षण नव्हते. जो तिचा मुलभूत हक्क आहे.
3. मनुस्मृतीत समानता नव्हती.
4. मनुस्मृतीत वारसा हक्क स्त्रियांना नाकारलेला आहे.

संशोधनाचे गृहितके :

1. मनुस्मृतीत शुद्राला कडक शिक्षेची तरतुद होती. जी इतर समाजाला नव्हती.

2. मनुस्मृतीत शिक्षणाचा हक्क नव्हता.

3. समाजाची रचना विषमतेवर आधारित होती. ज्यात निश्चित नियम कायदे नव्हते.

4. स्त्रियांना सामाजीक, राजकीय स्वातंत्र नव्हते.

तथ्य संकलनः

प्रस्तुत संशोधन अभ्यासात प्रामुख्याने ऐतिहासिक व वर्णनात्मक पध्दतीचा अवलंब करण्यात आला आहे. अभ्यासात ज्या साधन सामुग्रीचा वापर करण्यात येणार आहे. त्यात प्राथमिक सामुग्री आणि दुय्यम सामुग्रीचा वापर करण्यात येणार आहे.

प्राथमिक सामुग्री :– यात बाबासाहेब आंबेडकर लिखित ग्रंथ, संदर्भ पुस्तके, भाषणे इ. चा उपयोग करण्यात आला.

दुय्यम सामुग्री :– या साधनात विविध संशोधन ग्रंथ आणि संदर्भ पुस्तके, नियतकालिकेमधून घेतली आहे.

संशोधन आराखडा :

प्रकरण पहिले

प्रस्तावना

हे या शोध प्रबंधातील पहिले प्रकरण असून यात प्रस्तावना, अभ्यास विषयाचे महत्व,संशोधनाची समस्या, पुर्व संशोधनाचा आढावा, संशोधनाची उदिष्टे, गृहितके, संशोधन पध्दतीत प्राथमिक व दुय्यम साधणे व संशोधन आराखडयाचा समावेश केला आहे.[5]

प्रकरण दुसरे

स्वातंत्र्यापुर्वी भारतातील महिलांची स्थिती

हिंदु स्त्रियांची स्थिती चांगली नव्हती. मुलीला एक दायित्व किंवा बोजा समजले जात. मुलीचा जन्म ही अशुभ घटना मानली जाई. काही राजपुतांमध्ये मुलीचा जन्म झाल्यानंतर तिला मारण्यात येत असे. कर्नल टॉडच्या मते, '' ज्या दिवशी मुलीचा जन्म होई त्या दिसाला शापित दिस समजला जाई. स्वातंत्र्यापुर्वी बालविवाह, हुंडा पध्दती ही एक चाल होती. पुरूष मंडळी अनेक विवाह करत. अजुन विधवाची जास्तच दयनीय स्थिती होती.[6]

प्रकरण तिसरे

हिंदु कोड बिलचा परिचय

यात प्रस्तावना मनुस्मृतीतील विषमता, नावातील विषमता, उपनयनातील विषमता, या विषमतेतील विवाहातील विषमता, मनुस्मृतीतील शिक्षेचे स्वरुप, मनुस्मृतीतील शुद्राच्या शिक्षा स्त्रि – संदर्भातील वर्गागणीक शिक्षा, ब्रम्हहत्येचे पातक, शुद्रालाच कठोर शिक्षा का ? समानता इंग्रजाची भारताला देण, इंग्रजी अमदानातील कायदे व्यवस्था, बालहत्या प्रतीबंधाचा पहिला कायदा, सतीची चाल, व्यक्तीगत कायदयातील सुधारणा, देशमुख कायदा, बी.एन. राव सिलेक्टीचे कार्य, बिलावरील प्रांतीक सरकारांची मते, हिंदु कोडाची सनातनी कारणमीमांसा, हिंदु नाव त्यागून वैदिक नाव धारण करावे, हिंदु ऐवजी वैदिक राष्ट्र हवे, राव कमेटीतील सदस्यांचे चारीत्रहनन, के.एम.मुन्सीचे मत धर्म मंडळाचे मत इ.चा समावेश आहे.[7]

प्रकरण चौथे

हिंदु कोड बिल रचना

प्रस्तावना, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे हिंदु कोड बिल, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची विचार सरणीला डॉ. राजेन्द्रप्रसादाचा विराध, पं. नेहरुचे अनुकुल मत, बहुमताची मान्यता लक्षात

घ्यावी – डॉ. राजेन्द्र प्रसाद, शंकाराचार्य ब्रम्हानंद, सारस्वती यांचे मत, स्वामी करपात्री यांचे उद्‌गार, स्वामी यांचा विरोध, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे उत्तर, बिलाला पाठींबा, डॉ. राजेन्द्रप्रसाद, डॉ. पट्टाभि सीताराम यांचे मत, हिंदु कोड बिलावरील चर्चा – 1949, लोकसभेतील सभासदांची विचारसरणी, जेरे चा कट्टर विरोध आणी टीका, वि.स. खांडेकरांचे जेरे शास्त्रीस उत्तर आणी लोकसभेतील चर्चा – 1951.

डॉ. आंबेडकर भारताचे मनु, डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जीना – डॉ. आंबेडकरांचे उत्तर, पदमजा नायडू तर्फे डॉ. आंबेडकरांचा गौरव, सिव्हील कोड पचविले गेले पाहिजे – डॉ. आंबेडकर, राष्ट्रपती डॉ. राजेन्द्रप्रसाद यांचा विरोध पं. नेहरुचे सडेतोड उत्तर, विराधकांचे तंत्र, हिंदु कोड बीलाची लोकसभेतील सभासदांची विचार डॉ. आंबेडकरांचा राजीनामा, बिलाच्या पराभवाची कारणमीमांसा, बुध्दीवादयाचा पराभव की जातीयतेचा विजय ? लोकसभेतील चर्चेचा एक शोध, हिंदु कोड बीलाचे इप्सित, हिंदु कोड बील सिलेक्ट कमिटीने दुरुस्त केल्याप्रमाणे बिल.[8]

प्रकरण पाचवे

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांची हिंदु कोड बिलावरिल भूमिका

सर. बी. एन. राव यांच्या सिलेक्ट कमिटीने अनुकुल प्रतिकुल अशा सगळ्या मत मतांतरांचा सारासार विचार करुन सादर केलेल्या अहवालावर व मुद्यांवर आधारित एकदाचा हिंदु कोड बीलाचा मसूदा तयार करण्यात आला. हे बिल 11 एप्रिल 1947 रोजी जोगेंद्रनाथ मंडळ यांनी लोकसभेतील विचारार्थ मांडले. परंतु हिंदु कोड बिलावरील सोपस्कार अजून पुर्ण झालेला नव्हता कारण सत्तांतराच्या फार मोठ्या प्रक्रियेला सुरुवात झाली होती.

9 एप्रिल 1948 रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या अध्यक्षतेखाली कायदेपंडिताची विव्दानांची व समाजसुधारकांची अशा एकूण 20 लोकांची सिलेक्ट कमिटी नेमली गेली. यात स्त्रियांचा सुध्दा समावेश होता.[9]

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या हिंदु कोड बिलाला डॉ. राजेन्द्रप्रसादाचा विराध होता. पं. नेहरुचे अनुकुल मत होते. बहुमताची मान्यता लक्षात घ्यावी – डॉ. राजेन्द्र प्रसाद. शंकाराचार्य ब्रम्हानंद, सारस्वती यांचे मत, स्वामी करपात्री यांचा विरोधाला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे उत्तर. बिलाला पाठींबा, डॉ. राजेन्द्रप्रसाद, डॉ. पट्टाभि सीताराम यांचे मत, शेवटी 7 फेब्रुवारी 1949ला हिंदु कोड बिल लोकसभेपुढे मांडले. सभासदांची जेरे चा कट्टर विरोध आणी टीका, वि.स. खांडेकरांचे जेरे शास्त्रीस उत्तर आणी लोकसभेतील चर्चा 1951मध्ये झाली. डॉ. आंबेडकर भारताचे मनु अशी टीका झाली. डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जींना – डॉ. आंबेडकरांनी उत्तर दिले. पदमजा नायडू तर्फे डॉ. आंबेडकरांचा गौरव करण्यात आला. सिव्हील कोड पचविले गेले पाहिजे – डॉ. आंबेडकर, हिंदु कोड बीलाची लोकसभेतील सभासदांचा विरोध पाहता डॉ. आंबेडकरांनी मंत्रीपदाचा राजीनामा दिला होता. बिलाच्या पराभवाची कारणमीमांसा, बुध्दीवादयाचा पराभव की जातीयतेचा विजय ? लोकसभेतील चर्चेचा एक शोध, हिंदु कोड बीलाचे इप्सित, हिंदु कोड बील.[10]

प्रकरण सहावे

साराशं / समारोप

मनुने स्त्रियांना धार्मिक स्वातंत्र दिले नव्हते. जो तिचा वैयक्तिक अधिकार तसेच मुलभूत अधिकार आहे. हिंदु धर्मात असमानता आहे त्याप्रमाणे त्याच्या रितीरीवाजात ही असमानता आहे तसेच त्यांच्या विवाहात ही असमानता सांगीतली आहे. वरच्या जातीप्रमाणे खालच्या जातीतल्या लोकांना विवाहातही असमानता आहे. मनुस्मृतीत स्त्रियांना शिक्षणाचा अधिकार नाकारला आहे. मनुने सर्व जातीतील लोकांना शिक्षणातही समानता ठेवलेली नाही ती जातीनुसार भिन्न आहे. तसेच मनुस्मृतीत वारसा हक्क स्त्रियांना नाकारलेला आहे. दलित,

स्त्रीया तसेच खालच्या जातीवर मनुने अनेक जातक अटी लादल्या आहेत. 1856 पर्यंतचे कायदे सगळ्या धर्मियांना समान होते. त्यानंतरचे व्यक्तीगत स्वरुपातले कायदे त्या त्या धर्मियासाठी त्यांच्या लोकांनी दिलेले नव्हते.[11]

मनुस्मृतीने चातुर्वर्णागणिक माणसामाणसात फरक केलेला आहे. तिचे कायद्यासाठी माणसांचे गट लक्षात घेतले आहेत. एका गटातील माणूस दुसऱ्या गटातील माणसाबरोबर समान मानला गेला नाही. एक व्यक्ती दुसऱ्या व्यक्तीपासून वेगळी ओळखली जावी म्हणून भिन्न नावे, भिन्न पोषाख, भिन्न उपनयन, भिन्न शिक्षा पाळल्या गेल्या. जन्मापासून लागलेले हे विषमतेचे कायदे हिंदु संस्कारात माणसाच्या मरणापर्यंत कायम आहेत.मरणोत्तर माणसाचे प्रेत सुध्दा गावाबाहेर कोणत्या दिशेच्या वेशीतुन न्यावे याचाही निर्बंध मनुस्मृतीने घातले ते असे गावातील दक्षिण दिशेने वेशीने वेश्याचे प्रेत, उत्तर दिशेच्या वेशीने ब्राम्हणाचे प्रेत स्मशानभूमीत न्यावे. हिंदु धर्म हा असा विषमतावादी आहे.

मनुस्मृती ही भेदाभेदीला खतपाणी घालणारी आहे. माणसामाणसात भेद निर्माण करणारी आहे. स्पृश्य-अस्पृश्य, उच्च-निच्च, असे भेद मनुस्मृतीत सांगीतले आहेत. [12]

संदर्भसुची :

1. डॉ. आंबेडकर आणि हिंदु कोड बील – प्रमोद वाकळे, नितीन धनराज हनवते, नागपुर प्रकाशन, 2 ऑक्टोबर 2014 पे.नं.3
2. डॉ. आंबेडकर आणि हिंदु कोड बील – प्रमोद वाकळे, नितीन धनराज हनवते, नागपुर प्रकाशन, 2 ऑक्टोबर 2014 पे.नं.14
3. डॉ. आंबेडकर आणि हिंदु कोड बील – प्रमोद वाकळे, नितीन धनराज हनवते, नागपुर प्रकाशन, 2 ऑक्टोबर 2014 पे.नं.16 ते 17
4. क्रांती आणि प्रतिक्रांती – डॉ.भीमराव रामजी आंबेडकर संपादक – डॉ.सारनाथ सौदंडकर, सारनाथ प्रकाशन परभणी 14 जानेवारी 2019 पे.नं.143

5. क्रांती आणि प्रतिक्रांती – डॉ.भीमराव रामजी आंबेडकर संपादक – डॉ.सारनाथ सौदंडकर, सारनाथ प्रकाशन परभणी 14 जानेवारी 2019 पे.नं.144
6. डॉ. आंबेडकर आणि हिंदु कोड बील प्रमोद वाकळे, नितीन धनराज हनवते नागपूर प्रकाशन 2014 पे.नं.5
7. महाड सत्याग्रह आणि मनुस्मृती दहन – प्रदीप गायकवाड, क्षितीज पब्लिकेशन, नागपूर 21 ऑक्टोबर 2007 पे.नं.243
8. शुद्र पुर्वी कोण होते ? –डॉ. आंबेडकर,नागपुर प्रकाशन, 1 ऑक्टोबर 2001 पे.नं.35
9. महाडचा सत्याग्रह आणि मनुस्मृती दहन – प्रदीप गायकवाड, क्षितीज पब्लीकेशन नागपूर 21 ऑक्टोबर 2007 पे.नं. 249
10.लोकराज्य धम्मचक्र प्रवर्तन सुवर्णा महोत्सव विशेषांक ऑक्टोबर 2006 पे.नं. 114
11.डॉ. आंबेडकर आणि हिंदु कोड बील चांगदेव भवानराव खैरमोडे पुणे, प्रकाशन, फेब्रुवारी 1987 पे.नं.80
12. हिंदु कोड बील आणि डॉ. आंबेडकर खंड 14, हरी नरके, म.ल.कासारे एन. जी. कांबळे, अशोक गोडघासे मुंबई प्रकाशन 2005 पे.नं. 115 ते 125

संशोधक
सिमला बन्सीधर तुपसमिंद्रे
एम.ए.एम.फिल राज्यशास्त्र

मार्गदर्शक
प्रा.डॉ.पी.एस.लोखंडे
श्री शिवाजी कॉलेज, राज्यशास्त्र विभाग, परभणी